# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३५८/२०२३ दिनांक – १७/१०/२०२३

## Credit Card द्वारे फसवणूक रक्कम रु. ३,१४,७६१/- परत करण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नयानगर परिसरातील इसम नामे श्री. बाबुराज आचार्य हे त्यांचे आयसीआयसीआय क्रेडिट कार्ड चे कस्टमर केअरचा क्रमांक ऑनलाईन सर्च करीत होते. तक्रारदार यांना काही वेळानंतर अनोळखी मोबाईल धारकाचा फोन आला व त्याने आयसीआयसीआय क्रेडिट कार्ड विभागातुन बोलत असल्याचे सांगितले. तक्रारदार यांनी त्यांचे अडचणीबाबत सांगितले असता अनोळखी इसमाने तक्रारदार यांना क्विक सपोर्ट अॅप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांचे खात्यातुन एकुण ४,१९,०००/- रु कपात झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला. सदरबाबत सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारी अर्ज प्राप्त करण्यात आलेला होता.

### (सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक – १९०१-बी/२०२३ दि.१९/०८/२०२३)

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेबाबत संबंधीताना तात्काळ पत्रव्यवहार करुन **रक्कमेपैकी ३,१४,७६१/- रक्कम त्यांचे मुळ खात्यावर** परत मिळविण्यात आली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Credit Card संदर्भातील माहिती कोणाकडेही उघड करू नये**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **आपले मोबाईल फोन मध्ये कोणतेही अनोळखी अॅप डाऊनलोड करु नये.**
- **फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू नका.**
- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे इंटरनॅशनल ट्रॅन्झॅक्शन झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि.स्वप्नील वाव्हळ, म.पो.अं. अमिना पठाण, सुवर्णा माळी, पो.अं.कुणाल सावळे, यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

----0000----